# उप वनसंरक्षक, अलिबाग वन विभाग, अलिबाग यांचे कार्यालय

मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड, पीन नं. 402201, फोन नं. 02141-222016, फॅक्स नं. 02141-222216

ईमेल - dycfalibag@mahaforest.gov.in


**पत्र**

विषयः- Rehabilitation & Up gradation of newly declared Shahapur-Murbad-Karjat Khopoli NH-548A Section from Shahapur to Patgaon Section II design CH Km 43+783 to two Lane with the paved Shoulders in the State of Maharashtra Engineering procurement & Construction (EPC) Mode (Job No. NH.548A MAH 2017-18 1197 dt. 16/01/2018.

जावक क्र. ब/20/जमिन/ 1660/2018-19.

अलिबाग - 402 201, दिनांकः 29/06/2019.

प्रति,

उप अभियंता,

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मार्यादित,

बांद्रा रेक्लेमेशन बस डेपोच्या समोर,

लिलावती हॉस्पीटल, जवळ के .सी मार्ग, बांद्रा(प.)मुंबई.

संदर्भः- 1) या कार्यालयाचे पत्र क्र. ब/20/जमिन/ 5226 दिनांक 13/03/2019.

2)आपलेकडील पत्र क्र. NH-2019/02/DE/C.R No. P-S/ENGG/3610 दिनांक 03/06/2019.

विषयांकीत रस्त्याचे रुंदीकरण व मजबूतीकरणाकरीता वन जमिन मागणीचा प्रस्ताव आपलेकडील संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये 1 प्रतीत या कार्यालयास सादर करणेत आलेला आहे. सदर प्रस्तावाची छाननी केली असता खालील प्रमाणे त्रुटी आढळुन आल्या आहेत.

1. प्रस्तावासोबत आपण 1:30000 या प्रमाणातील टोपोशिट जोडली आहे. वन (संवर्धन) अधिनियम 1980 चे वनजमिन मागणी प्रस्तावासोबत 1:50000 या मुळ प्रमाणातील टोपोशीटवर मागणी रस्त्याचा आखणी मार्ग दर्शवुन त्याचे सुरवात ते शेवट व ज्या ज्या ठिकाणी वळण आहेत त्या सर्व ठिकाणचे अक्षांश /रेखांश नकाशावर दर्शवावे. तसेच मागणी क्षेत्र 1:50000 या मुळ प्रमाणातील दोन वेगवेगळया टोपोशीटवर असेल तर त्याप्रमाणे दोन्ही टोपोशिट स्वतंत्र जोडुन त्यावर रस्त्याचा आखणी मार्ग दर्शवुन रस्त्याचे आखणी मार्गापासून भिमाशंकर अभयारण्य, माथेरान गिरीस्थान व त्याचे Eco Sensitive Zone चे Buffer zone, पश्चिम घाट संवेदनशील क्षेत्र, सुधागड अभयारण्य इत्यादीचे अंतर व त्याबाबतची सुची क्षेत्र विवरण तक्ता टोपोशिट नकाशावर दर्शविणे आवश्यक आहे.

2. मौजे टाकवे ता. कर्जत येथील प्रस्तावातील गांव नकाशावर दर्शविलेले रस्त्याचे आखणी मार्गाप्रमाणे वन स. नं. 2/16+17 चे क्षेत्र बाधित होत आहे. परंतु त्याचा वैधानिक दर्जा हा

संरक्षित वन दर्शविले आहे. परंतु वनक्षेत्र अंतिम संपादित खाजगी वन आहे. त्यानुसार दुरुस्ती करावी. तसेच क्षेत्र विवरण तक्त्यात वनेत्तर स. नं. चे मागणी क्षेत्र दर्शविलेले नाही ते दर्शवावे.

3. मौजे-वंजारवाडी ता. कर्जत येथील प्रस्तावातील गावं नकाशावर दर्शविलेले रस्त्याचे आखणी मार्गाप्रमाणे वन स. नं. 35 पैकी व 50 पैकी (जुना स. नं. 116) चे वनक्षेत्र (भा.व.अ. 1927 चे कलम 4 अन्वये "राखीव वन") व स. नं. 47 (जुना स. नं. 129) चे वनक्षे) (अंतिम संपादित खाजगी वन ) बाधीत हाते आहे. त्यानुसार दुरुस्ती होणे आवश्यक आहे. तसेच क्षेत्र विवरण तक्तयात वनेत्तर सं. नं. चे मागणी क्षेत्र दर्शवावे. क्षेत्र विवरण तक्तयात वनक्षेत्र मागणी स. नं. 13 दर्शविलेला आहे. परंतु नकाशावर बाधीत होत असलेचे दिसुन येत नाही. तरी याबाबत खात्री करुन दुरुस्ती करणेत यावी.

4. मौजे वारे ता. कर्जत येथील प्रस्तावातील गांव नकाशावर दर्शविलेले रस्त्याचे आखणी मार्गाप्रमाणे वन सं. नं. 102/1ब पार्ट (अंतिम संपादित खाजगी वन) व वन स. नं. 82 (राखीव वन) चे वनक्षेत्र बाधीत होत आहे. त्याप्रमाणे क्षेत्र विवरण तक्त्यात दर्शविलेले आहे. परंतु वनक्षेत्राचा वैधानिक दर्जा संरक्षित वन दर्शविलेला आहे. तरी या क्षेत्राबाबत वनक्षेत्राचा वैधानिक दर्जा नकाशा व क्षेत्र विवरणामध्ये दुरुस्ता होणे आवश्यक आहे. सदर गावाचा समावेश पश्चिम घाट परिसंवेदनशील क्षेत्रामध्ये होत आहे.

5. मौजे कळंब ता. कर्जत येथील प्रस्तावातील गाव नकाशावर दर्शविलेले रस्त्याचे आखणी मार्गाप्रमाणे वन स. नं. 87, 76 अंतिम संपादित खाजगी वनाचे क्षेत्र बाधीत होत आहे. परंतु प्रस्तावातील समाविष्ट गावनकाशावर वनक्षेत्र मागणीचे क्षेत्र विवरण तक्ता दर्शविलेला नाही. तो दर्शविणे आवश्यक आहे. व त्यामध्ये वनेत्तर क्षेत्राचे बाधित होणारे सं.नं. चे क्षेत्र दर्शविणे आवश्यक आहे.

6. मौजे -सुगवे ता. कर्जत येथील प्रस्तावातील गांव नकाशावर दर्शविलेले रस्त्याचे आखणी मार्गाप्रमाणे स. नं. 35/5 चे क्षेत्राचा वैधानिक दर्जा संरक्षित वन दर्शविलेला असुन तो चुकीचा आहे. त्याचा वैधानिक दर्जा अंतिम संपादित आहे. त्याप्रमाणे क्षेत्र विवरणामध्ये त्याचा समावेश होणे आवश्यक आहे. सदर गावाचा समावेश पश्चिम घाट परिसंवेदनशील क्षेत्रामध्ये होत आहे.

7. मौजे पोई ता. कर्जत येथील स. नं. 10 चे क्षेत्राचा वैधानिक दर्जा संरक्षित वन दर्शविलेला असुन तो चुकीचा आहे. सदर स. नं चे काही हिश्यास खाजगी वनाच्या तरतुदी लागु झालेल्या आहेत तथापी रस्त्यामध्ये बाधित होणारे स. नं. 10 पैकी कोणत्या हिश्याचे क्षेत्र बाधित होत आहे. याचा तपशिल उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही. त्यामुळे रस्त्यात बाधित होणा-या क्षेत्रास खाजगी वनाच्या तरतुदी आकृष्ठ होत आहेत अगर कसे याची निश्चित खात्री होत नाही. तरी सदर सर्व्हे नंबरचे हिस्यांची माहिती दर्शविण्यात यावी. तथापी आपण प्रस्तावांत पूर्ण स. क्र. 10 चे क्षेत्र वनक्षेत्र म्हणुन दर्शविणेत येत असेल तर सदर क्षेत्राचा दर्जा संरक्षित वनाचा नसुन तो खाजगी वनाचा नमुद करणे आवश्यक आहे.

8. मौजे कशेळे ता. कर्जत येथील स. नं. 16,17,12,19,21 चे क्षेत्रास खाजगी वनाच्या तरतुदी लागु झालेल्या आहेत. तथापी रस्त्यामध्ये बाधित होणा-या स. नं. 16,17,12,19,21 पैकी कोणत्या हिश्याचे क्षेत्र बाधित होत आहे त्याचा तपशिल उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही.

त्यामुळे रस्त्यात बाधित होणा-या क्षेत्रास खाजगी वनाच्या तरतुदी आकृष्ठ होत आहेत अगर कसे याची निश्चित खात्री होत नाही. तथापी आपण सदर वरिल सर्व्हे क्रमांमाचे पूर्ण क्षेत्रास वनक्षेत्र म्हणुन दर्शविले तर सदर क्षेत्राचा दर्जा संरक्षित वनाचा नसुन तो खाजगी वनाचा नमुद करणे आवश्यक आहे.

9. मौजे नालधे, ता. कर्जत येथील प्रस्तावातील गाव नकाशाव दर्शविलेले रस्तयाचे आखणी मार्गाप्रमाणे स.नं. 43/16, 43/17, 43/18+19, 42/20 चे क्षेत्र (अंतीम संपादित खाजगी) वन बाधीत होत आहे. परंतु नकाशावर दर्शविलेले क्षेत्रविवरण तक्यांत स.नं. 16 (संरक्षीत वन) व सर्व्हे नं. 6, 43, 71, 53, 72 चे क्षेत्र वनक्षेत्र मागणीमध्ये वैधानीक दर्जा राखीव वन दर्शविला आहे. तरी सर्व्हे नं. 6, 43, 71, 53, 72 चे क्षेत्र अंतीम संपादीत वन व सर्व्हे नंबर 16 चे क्षेत्र खाजगी वन म्हणून दर्शविणे आवश्यक आहे.

10 मौजे वंजारवाडी ता. कर्जत येथील प्रस्तावांतील गावनकाशावर दर्शविलेल्या रस्त्याचे आखणी मार्गाप्रमाणे स. नं. 13 (जुना स. नं. 102 चे क्षेत्र भा. व. अ. 1927 चे (कलम 4 राखीव वन) बाधित होत आहे. परंतु नकाशावर दर्शविलेल्या क्षेत्र विवरणात स. नं. 13 चे क्षेत्र संरक्षित वन दर्शविलेले आहे. त्यामध्ये दुरुस्ती होणे आवश्यक वाटते. मौजे वंजारवाडी हे गांव जुने भालीवडी गावापासुन तयार झालेले असल्याने सदर गावांतील इतर सर्व्हे नंबर बाबत मुळ भालीवडी लागवांतील क्षेत्राची माहिती देण्यात यावी जेणेकरुन प्रस्तावांत बाधीत होणारे क्षेत्रास खाजगी वनाच्या तरतुदी लागू झालेल्या आहेत अगर कसे याची खात्री करणे शकय होईल.

11 प्रस्तावातील जोडलेल्या गांव नकाशावर दर्शविलेले रस्त्याचे आखणी मार्गातील वनजमिनीचे बाधीत हेणारे स. नं. चे क्षेत्राच्या वैधानिक दर्जाप्रमाणे रंगसंगतीने क्षेत्र दर्शविणे आवश्यक आहे.

12. प्रस्तावातील जोडलेल्या गांव नकाशावर प्रस्तावासोबत वनजमिन बाबतचा क्षेत्र विवरण तक्त्यामध्ये रस्त्याचे मागणी अनुक्रमाने येणारे गावांप्रमाणे क्रमवार लावुन त्याप्रमाणे वनक्षेत्राचे व वनेत्तर क्षेत्राचे स. नं. निहाय मागणी क्षेत्र एकाच क्षेत्र विवरण तक्त्यात वेगवेगळे दर्शवून मागणी नमुद करणे आवश्यक आहे. व प्रस्तावात समाविष्ट नकाशे संक्षाकित असणे आवश्यक आहे.

13. प्रस्तावामध्ये अस्तित्वातील रस्त्याचे रुंदीकरण व नुतनीकरण करणेसाठी वनजमिन मागणी करणेत येत आहे. परंतु टोपोशिट वरील पुर्वी अस्तित्वांतील रस्त्याप्रमाणे काही ठिकाणी प्रस्तावित रस्ता नविन क्षेत्रातुन दर्शविलेला आहे. त्याप्रमाणे त्याचे संबंधित गावातील स. न. साठी त्याचे रुंदी व लांबी प्रमाणे क्षेत्र मागणी करणे आवश्यक आहे.

14. प्रस्तावामध्ये ज्या रस्त्याचे रुंदीकरण व नुतनीकरण करणे प्रस्तावित आहे त्याच्या टोपोशिटवरील वैधानिक दर्जाप्रमाणे पुर्वीची रस्त्याची रुंदी किती आहे त्याबाबत प्रस्तावातील मागणीमध्ये दर्शविलेले नाही. आणि दोन्ही बाजुची रुंदी 14.5 मी एवढी दर्शवुन वनक्षेत्र मागणी केली आहे. त्यासाठी जुन्या रस्त्याचे रुंदीबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रस्त्यांचे मंजुर रुंदीबाबतचे प्रमाणपत्र घेऊन प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय वनक्षेत्र मागणीबाबत अचुक वनक्षेत्र मागणी किती होणार आहे. याबाबत स्पष्ट नमुद करणे आवश्यक आहे.

15. प्रस्तावात समाविष्ट आखणी मार्गामध्ये बाधीत होणा-या वन व वनेत्तर क्षेत्राचे महसुल अधिकारी अभिलेख 7/12 उतारे मराठी व आंग्ल भाषेमध्ये प्रस्तावात समाविष्ट करणे आवश्यक आहे.

16. प्रस्तावात समाविष्ट आखणी मार्गामध्ये बाधीत होणा-या वन व वनेत्तर क्षेत्राचे KMI File ची सीडी प्रसतावात समाविष्ट करणे आवश्यक आहे.

17. प्रस्तावांत सामील करण्यात आलेली विहीत प्रपत्रांती प्रमाणपत्र वेगवेगळया पानावर देण्यात यावीत.

18. प्रस्तावांत विहित नमुन्यांतील विवरणपत्र सामील करण्यात यावे. सदर विवरण पत्रांत वन व वनेत्तर क्षेत्राची माहिती देण्यात यावी.

20. प्रस्तावांत बाधीत होणारे वनक्षेत्रामध्ये वन हक्क बाधीत होत नसल्याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडील विहित प्रपत्रांतील प्रमाणपत्र प्रस्तावांत सामील करणे आवश्यक आहे.

21. प्रस्तावांत रस्त्याचा कॉससेक्शन प्लॅन देखील सामील करण्यात यावा.

22. प्रस्तावांत सामील करण्यात येणा-या छायांकीत प्रती साक्षांकीत करुन प्रस्तावांत सामील करण्यात याव्यात.

तरी वरील प्रमाणे त्रुटींची पूर्तता करुन प्रस्ताव फेर सादर करणेत यावा ही विनंती. तसेच सदर प्रस्ताव hptts://parivesh.nic.in या संकेतस्थळावर देखील अपलोड करणेत यावा ही विनंती.

(मनीष कुमार)
उप वनसंरक्षक,
अलिबाग.

प्रतिलिपीः- मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांचेकडे माहितीसाठी सादर.
प्रतिलिपीः- जिल्हाधिकारी, रायगड अलिबाग यांचेकडे माहितीसाठी सादर.
प्रतः- सहा. वनसंरक्षक, अलिबाग व परिक्षेत्र वन अधिकारी, कर्जत (पश्चिम), कर्जत (पूर्व), खालापूर यांचेकडे माहितीसाठी रवाना.